**<u>ठळक बातम्या</u>**

- शांघाय सहकार्य संघटनेच्या संरक्षण मंत्र्यांच्या बैठकीतल्या संयुक्त जाहीरनाम्यावर स्वाक्षरी करायला भारताचा नकार

- नासाच्या ॲक्सिओम फोर या मोहिमेअंतर्गत शुभांशु शुक्ला यांच्यासह ४ अंतराळवीर आंतरराष्ट्रीय अंतराळ स्थानकात दाखल

- महाराष्ट्रात वीजदरात टप्प्याटप्प्यानं ५ वर्षात २६ टक्के कपात होणार, पहिल्या वर्षी १० टक्के कपात, सुधारित दर येत्या १ जुलैपासून लागू

- राज्य विधिमंडळाचं पावसाळी अधिवेशन येत्या सोमवारपासून १८ जुलैपर्यंत

- राजर्षी छत्रपती शाहू महाराजांच्या १५१व्या जयंतीनिमित्त सर्वत्र व्याख्यानं, समता दिंडी, अशा विविध कार्यक्रमांनी त्यांना अभिवादन

**आणि**

- मुंबई शेअर बाजाराच्या सेन्सेक्समधे १ हजार अंकांची वाढ

**<><><><>**

चीनच्या किंगदाओ इथं झालेल्या SCO  शांघाय सहकार्य संघटनेच्या संरक्षण मंत्र्यांच्या बैठकीत भारतानं संयुक्त जाहीरनाम्यावर स्वाक्षरी करायला नकार दिला आहे. घोषणापत्रात सीमापार दहशतवादी कारवायांचा उल्लेख नसल्यानं भारतानं नाराजी व्यक्त करत स्वाक्षरी करण्यास नकार दिला. दहशतवाद, कट्टरतावाद आणि उग्रवाद हे प्रादेशिक शांतता आणि परस्पर विश्वासासाठी सर्वात मोठे धोके असल्याचं  संरक्षण मंत्री राजनाथ सिंह यांनी या बैठकीत सांगितलं.

शांघाय सहकार्य संघटनेच्या सदस्य राष्ट्रांनी दुटप्पी भूमिका न घेता दहशतवादाला पाठबळ देणाऱ्या देशांचा निषेध करावा असं आवाहन त्यांनी केलं.

**<><><><>**

राज्यात प्रथमच वीजग्राहकांना दरकपात मिळणार आहे. मुख्यमंत्री देवेंद्र फडनवीस यांनी आज मुंबईत वार्ताहर परिषदेत ही माहिती दिली. वीजदरकपात करण्यासाठी महावितरणनं केलेल्या याचिकेवर राज्य वीज नियामक आयोगानं दिलेल्या निकालानुसार टप्प्याटप्प्यानं ५ वर्षात २६ टक्के कपात वीजदरात केली जाईल. सुधारित दर येत्या १ जुलैपासून लागू होणार असून पहिल्या वर्षी १० टक्के कपात होणार आहे.भविष्यातल्या वीज खरेदीत सौर ऊर्जा आणि हरित ऊर्जेवर भर दिल्यामुळे वीजखर्चात बचत होणार असल्याचं मुख्यमंत्र्यांनी सांगितलं.

दरमहा १०० युनिटपेक्षा कमी वापर करणाऱ्या ग्राहकांना दरकपातीचा जास्त फायदा होईल. औद्योगिक वापरासाठीचा दर सध्या १० रुपये ८८ पैसे आहे तो पाच वर्षांत ९ रुपये ९७ पैशांपर्यंत कमी होईल. व्यापारी दर १६ रुपये ९७ पैशांवरुन पाच वर्षांत १५ रुपये ८७ पैसे होईल, असं ते म्हणाले.

राज्यात शिक्षणात पहिली ते पाचवीपर्यंत हिंदीची सक्ती नाही, आणि मराठी भाषा अनिवार्य आहे असं त्यांनी एका प्रश्नाच्या उत्तरात सांगितलं.

दरम्यान, हिंदी सक्तीच्या विरोधात येत्या ५ जुलै रोजी मुंबईत गिरगाव चौपाटीवर महाराष्ट्र नवनिर्माण सेना मोर्चा काढणार असल्याचं अध्यक्ष राज ठाकरे यांनी जाहीर केलं आहे.

**<><><><>**

राज्य विधिमंडळाचं पावसाळी अधिवेशन येत्या सोमवारपासून मुंबईत सुरु होणार आहे. १८ जुलैपर्यंत हे अधिवेशन चालेल. विधिमंडळ कामकाज सल्लागार समितीच्या बैठकीत ही घोषणा करण्यात आली. या बैठकीला दोन्ही सभागृहांचे पीठासीन अधिकारी, विरोधी पक्षनेते, मुख्यमंत्री आणि मंत्रिमंडळातले काही सदस्य, सल्लागार समिताचे इतर सदस्य उपस्थित होते. बैठकीत अधिवेशनाच्या नियोजनावर चर्चा करण्यात आली.

**<><><><>**

नासाच्या ॲक्सिओम फोर या मोहिमेअंतर्गत भारतीय हवाई दलाचे ग्रुप कॅप्टन शुभांशु शुक्ला यांच्यासह ४ अंतराळवीरांना घेऊन निघालेलं स्पेसएक्स ड्रॅगन हे अंतराळयान आज दुपारी ४ वाजता आंतरराष्ट्रीय अंतराळ स्थानकावर पोहोचलं. त्यामुळे शुभांशु हे १९८४मध्ये राकेश शर्मा यांच्यानंतर अंतराळात जाणारे दुसरे तर आंतरराष्ट्रीय अंतराळ

स्थानकावर पोहोचणारे पहिले भारतीय ठरले आहेत. शुक्ला या मोहिमेदरम्यान सूक्ष्म गुरुत्वाकर्षणाशी संबंधित सात प्रयोग करतील. यात किरणोत्साराचा शैवालांवर होणारा परिणाम, अवकाशात बियाणं पेरणं अशा विविध प्रकारच्या प्रयोगांचा समावेश आहे.

या मोहिमेचं नेतृत्व अमेरिकेचे कमांडर पेगी व्हिटसन करत आहेत. हंगेरीचे टिबोर कापू आणि पोलंडचे स्लावोस उझनान्स्की हे या मोहिमेतले तज्ञ आहेत. तर शुक्ला पायलट म्हणून काम पाहत आहेत. केंद्रीय मंत्री जितेंद्र सिंह यांनी शुक्ला आणि त्यांच्या सहकारी अंतराळवीरांचं अभिनंदन केलं आहे.

**<><><><>**

दुचाकी वाहनांची संपूर्ण टोलमुक्ती सुरू राहील, असं रस्ते परिवहन आणि महामार्ग मंत्री नितीन गडकरी यांनी स्पष्ट केलं. दुचाकींवर टोल लादण्यात येणार असल्याचा कोणताही निर्णय प्रस्तावित नसून काही प्रसारमाध्यमांनी यासंदर्भात प्रसारित केलेलं वृत्त दिशाभूल करणारं असल्याचं त्यांनी सांगितलं.

**<><><><>**

जागतिक पातळीवर अमली पदार्थांचा गैरवापर आणि अवैध तस्करी विरोधात अमली पदार्थ विरोधी दिन पाळण्यात येत आहे. त्यानिमित्त विविध जनजागृतीपर कार्यक्रम होत आहेत.

**<><><><>**

राजर्षी छत्रपती शाहू महाराजांच्या १५१ व्या जयंतीनिमित्त त्यांना आज सर्वत्र अभिवादन करण्यात येत आहे.

राज्यपाल सी. पी. राधाकृष्णन यांनी राजभवनात छत्रपती शाहू महाराजांच्या प्रतिमेला पुष्पांजली वाहून अभिवादन केलं.

मुख्यमंत्री देवेंद्र फडनवीस, तसंच उपमुख्यमंत्री अजीत पवार आणि एकनाथ शिंदे यांनीही शाहू महाराजांना अभिवादन केलं.

कोल्हापूरमध्ये शाहू महाराजांची जयंती ‘सामाजिक न्याय दिन’ म्हणून साजरी करण्यात आली. यानिमित्तानं जिल्हा प्रशासन आणि सहायक आयुक्त समाजकल्याण विभागातर्फे दसरा चौकात समता दिंडीसह विविध कार्यक्रम आयोजित केले होते. समता दिंडीचे उद्घाटन पालकमंत्री प्रकाश आबिटकर यांनी केलं. वैद्यकीय शिक्षण मंत्री हसन

मुश्रीफ, खासदार शाहू महाराज छत्रपती, आमदार जयंत आसगावकर, जिल्हाधिकारी अमोल येडगे उपस्थित होते. राज्यात अनेक ठिकाणी शाहू महाराजांच्या जयंतीनिमित्तानं व्याख्यानं, समता दिंडी आणि चित्ररथ, संविधान जनजागृती कार्यक्रम झाले.

<><><>

पश्चिम आशियातली भूराजकीय स्थिती निवळल्याचे थेट परिणाम आज देशांतर्गत शेअर बाजारांवर पाहायला मिळाले. मुंबई शेअर बाजाराच्या सेन्सेक्समधे आज दिवसअखेर १ हजार अंकांची वाढ झाली आणि तो ८३ हजार ७५६ अंकांवर बंद झाला. राष्ट्रीय शेअर बाजाराचा निफ्टीही ३०४ अंकांची वाढ नोंदवत २५ हजार ५४९ अंकांवर बंद झाला.

<><><>

आरोग्य आणि निरोगीपणा जपण्यात देशाच्या समृद्ध संस्कृतीचं योगदान असल्याचं प्रधानमंत्री नरेंद्र मोदी यांनी आज सांगितलं. नवोन्मेषी स्टार्टअपची संख्या सध्या वाढत असून प्राचीन परंपरा आणि आधुनिक वैज्ञानिक दृष्टिकोन याचा ताळमेळ त्यामुळे राखला जातो असं ते म्हणाले. समाजमाध्यमावर मन की बातवरच्या एका पोस्टला त्यांनी प्रतिसाद दिला.

<><><>

चेन्नईमधे सुरु असलेल्या हॉकी इंडिया मास्टर्स चषक स्पर्धेच्या पुरुष गटात उद्या महाराष्ट्र आणि तमिळनाडूमधे विजेतेपदासाठी लढत होणार आहे. तिसऱ्या क्रमांकासाठीचा सामना चंडीगढ विरुद्ध ओदिशा असा होईल.
महिला गटात विजेतेपदाची लढत ओदिशा आणि पंजाब या संघांमधे होईल.

<><><>

केंद्रीय कृषी आणि शेतकरी कल्याण मंत्री शिवराज सिंग चौहान यांनी आजपासून पीकपेऱ्याप्रमाणे राज्यस्तरीय बैठकांची मालिका सुरू केली आहे. त्यातली पहिली बैठक आज भारतीय कृषी संशोधन संस्थेच्या इंदूर इथल्या राष्ट्रीय सोयाबीन संशोधन संस्थेत झाली. ते सोयाबीन उत्पादनाशी निगडित आढावा बैठक आणि कार्यशाळेत सहभागी झाले. या बैठकीला महाराष्ट्रासह राजस्थान आणि मध्य प्रदेशचे कृषी मंत्री सहभागी झाले होते.

<><><>

आवश्यक अटी पूर्ण न केल्याबद्दल ३४५ नोंदणीकृत पण मान्यताप्राप्त नसलेल्या पक्षांची नोंदणी रद्द करण्याची प्रक्रिया निवडणूक आयोगानं सुरू केली आहे. २०१९ पासून आतापर्यंत एकही लोकसभा, विधानसभा किंवा पोटनिवडणूक न लढलेल्या पक्षांची नोंदणी या प्रक्रियेत रद्द होणार आहे.

**<><><><>**

आयबीपीएस अर्थात इन्स्टिट्यूट ऑफ बँकिंग पर्सोनेल सिलेक्शनतर्फे घेतल्या जाणाऱ्या परीक्षा आणि भर्ती प्रक्रियांसाठी उमेदवार पडताळणीसाठी आधार प्रमाणीकरणाला आज सरकारनं मान्यता दिली. अर्थ मंत्रालयाअंतर्गत येणाऱ्या वित्त सेवा विभागानं तशी अधिसूचना जारी केली आहे.

**<><><><>**

हिंदी ही इतर भारतीय भाषांची प्रतिस्पर्धी नसून सहचर आहे, असं प्रतिपादन केंद्रीय गृहमंत्री अमित शहा यांनी आज केलं. नवी दिल्ली इथं राजभाषा विभागाच्या सुवर्णमहोत्सवी वर्षानिमित्त आयोजित कार्यक्रमाला ते संबोधित करत होते. प्रशासनानं लोकांच्या भाषेतच कामकाज करायला हवं, जोपर्यंत व्यक्ती तिच्या स्वतःच्या भाषेत व्यक्त होत नाही तोपर्यंत ती गुलामीच्या मानसिकतेतून बाहेर येणार नाही असं शहा म्हणाले.

**<><><><>**

सागरमाला फायनान्स कॉर्पोरेशन लिमिटेड या देशातल्या सागरी क्षेत्रातल्या पहिल्या बिगरबँकिंग आर्थिक कंपनीचं उद्घाटन आज केंद्रीय बंदरे, नौवहन आणि जलमार्ग मंत्री सर्बानंद सोनोवाल यांनी केलं. देशाच्या सागरी क्षेत्रातल्या वाटचालीत हा मैलाचा दगड असून

त्यामुळे बंदरे, सूक्ष्म, लघु आणि मध्यम व्यवसाय, स्टार्टअप आणि संस्था अधिक बळकट होतील असं ते म्हणाले. कार्यक्रमादरम्यान सोनोवाल यांनी सागरसेतू मंचाचंही उद्घाटन केलं.

**<><><><>**

बीड जिल्ह्यातल्या पोलीस दलामधले पोलीस उप निरीक्षक संतोष वजुरकर यांना आज राज्यपाल सी पी राधाकृष्णन यांच्या हस्ते राष्ट्रपती पदक प्रदान करण्यात आलं. मुंबई राजभवन इथं आज हा पुरस्कार सोहळा झाला. संतोष वजुरकर यांनी पोलीस दलात विविध पदांवर काम केलं आहे.

**<><><><>**

पंजाबमध्ये मोहाली इथल्या न्यायालयाने शिरोमणी अकाली दलाचे नेते विक्रम सिंग मजिठिया यांना सात दिवसांची पोलीस कोठडी सुनावली आहे. त्यांच्यावर ५४० कोटी रुपयांची अफरातफर केल्याचा आरोप आहे..

//<><><><>//